# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
## कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर
५३९, राजेंद्रनगर, कोल्हापूर-४१६ ००४.

दुरध्वनी क्र-०२३१-२६९६१०१/२/३ Website-www.sscboardkolhapur.in Email Id- divsec.kop@gmail.com


क्र.कोविमं/उमा/प्रात्य/ऑनलाईन/2626
कोल्हापूर ४१६ ००४
दिनांक :- 04/०१/२०२४

प्रति,
प्राचार्य,
सर्व माहिती तंत्रज्ञान शिकवणारे क. महाविद्यालये
सातारा/ सांगली/ कोल्हापूर

**विषय - उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी/मार्च २०२४ "माहिती तंत्रज्ञान"(आय.टी.) आणि "सामान्यज्ञान" (जी.के.) विषयाच्या ऑनलाईन परीक्षेबाबत...**

**संदर्भ - १) राज्य मंडळाचे पत्र क्र.रा.मं/ऑनलाईन/आय.टी./जी.के./५२६७ दि. ०५ डिसेंबर २०२३.**
**२) कार्यालयीन टिप्पणीचा मंजूरी दि.04/०१/२०२४.**

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय पत्रास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की "माहिती तंत्रज्ञान"(आय.टी.) या विषयाची परीक्षा दिनांक २० मार्च २०२४ ते २२ मार्च २०२४ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी ०१.३० आणि दुपारी ०३.०० ते ०५:३० याप्रमाणे सकाळच्या व दुपारच्या सत्रात प्रत्येकी २ तास ३० मिनिटे या कालावधीची राहील.

तसेच"सामान्यज्ञान"(जी.के.) विषयाची परीक्षा दिनांक २१ मार्च २०२४ ते २३ मार्च २०२४ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी ०१.०० आणि दुपारी ०३.०० ते ०५.०० याप्रमाणे सकाळच्या व दुपारच्या सत्रात प्रत्येकी २ तास या कालावधीची राहील. याबाबत खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

**केंद्रसंचालक/पर्यवेक्षक/नियुक्ती व परीक्षेचे साहित्य जमा करण्याबाबत व परीक्षेबाबतच्या सूचना-**

"माहिती तंत्रज्ञान"(आय.टी.) व "सामान्यज्ञान" (जी.के.) विषयाच्या ऑनलाईन परीक्षा संचालनाबाबत परीक्षा केंद्र संचालक, पर्यवेक्षक व तांत्रिक सहाय्यक यांच्या नेमणूका आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या स्तरावर करण्यात याव्यात व त्यांची नावे मंडळ कार्यालयाकडे पाठवून देण्यात यावीत. सदरच्या नेमणूका करीत असताना केंद्र संचालक व पर्यवेक्षक हे आय.टी. विषय न शिकवणारे असावेत याची नोंद घ्यावी. तसेच तांत्रिक सहाय्यक हे आय.टी. विषय शिकवणारे असावेत. त्यांची नावे **२० फेब्रुवारी २०२४** पूर्वी या कार्यालयाकडे पाठवावीत

"माहिती तंत्रज्ञान"(आय.टी.) विषय शिकविला जाणाऱ्या प्रत्येक कनिष्ठ महाविद्यालयांची संगणक प्रयोगशाळा व संगणक यंत्रणा परीक्षेसाठी सुसज्ज करण्यात यावी. सदर परीक्षा ज्या ठिकाणी "माहिती तंत्रज्ञान" (आय.टी.) विषय शिकवण्यास मान्यता दिलेली आहे, अशा कनिष्ठ महाविद्यालयातच घेण्यात येईल. (**"माहिती तंत्रज्ञान"(आय.टी.) विषय घेतलेल्या नियमित परीक्षार्थ्यांसाठी फक्त "माहिती तंत्रज्ञान"(आय.टी.) विषयासाठी त्यांचे कनिष्ठ महाविद्यालय हेच परीक्षा केंद्र राहिल**) या विषयासाठी विद्यार्थी त्यांच्या लेखी परीक्षा केंद्रावर (प्रसंगानुरूप) न जाता कनिष्ठ महाविद्यालयात जातील. तसेच पेपरची वेळ संपावयाच्या वेळेस कनेक्टीव्हीटी खंडीत झाली असेल तर पेपरची वेळ संपताच विद्यार्थ्यांनी दिलेली उत्तरे आपोआप सादर होतील. याबाबत विद्यार्थ्यांना कनिष्ठ महाविद्यालयांनी सूचना द्याव्यात. अंध, अपंग इत्यादी संवर्गातील विद्यार्थ्यांना लेखी परीक्षेप्रमाणे सवलत मान्य राहील व या विद्यार्थ्यांसाठी माहिती तंत्रज्ञान परीक्षेची वेळ ३.२० तासांची व सामान्यज्ञान परीक्षेची वेळ २.४० तासाची राहील.

**तांत्रिक व्यत्ययामुळे किंवा अन्य कारणामुळे परीक्षा देवू न शकणाऱ्या विद्यार्थ्यांबाबत करावयाची कार्यवाही तसेच परीक्षेसाठी नियुक्त केलेल्या विभागीय मुख्य व सहाय्यक समन्वयक यांची माहिती.**

या परीक्षा कालावधीत जे विद्यार्थी तांत्रीक व्यत्यय वा अन्य कारणामुळे निर्धारीत वेळापत्रकानुसार परीक्षा देऊ शकणार नाहीत. त्यांच्यासाठी खास बाब म्हणून सर्व परीक्षा केंद्रावर "माहिती तंत्रज्ञान"(आय.टी.) विषयासाठी

दि. २३.०३.२०२४ सकाळी ११.०० ते ०१.३० व दुपारी ०३.०० ते ०५.३० या दोन सत्रामध्ये व सामान्यज्ञान विषयासाठी दि.२६.०३.२०२४ रोजी सकाळी ११.०० ते ०१.०० व दुपारी ०३.०० ते ०५.०० या दोन सत्रांमध्ये पुनर्परीक्षेची संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.ज्या विद्यार्थ्यांची उपरोक्त कारणास्तव परीक्षा होणार नाही अशा कनिष्ठ महाविद्यालयांनी"माहिती तंत्रज्ञान"(आय.टी.) विद्यार्थ्यांची माहिती दि. २२.०३.२०२४ व "सामान्यज्ञान" (जी.के.) विद्यार्थ्यांची माहिती दि २३.०३.२०२४ रोजीच्या दूसऱ्या सत्रा पर्यंत विभागीय मंडळ कार्यालयातील विभागीय तांत्रिक सहाय्यक समन्वयकांना कळविणे आवश्यक आहे. दिनांक २३.०३.२०२४ व दिनांक २६.०३.२०२४ रोजी होणाऱ्या पुनर्परीक्षेसाठी कोणतेही अतिरिक्त शुल्क आकारण्यात येऊ नये.

मार्च २०२४ परीक्षेपासून गोपनीय साहित्य,तसेच गोपनीय सूचना ऑनलाईन स्वरुपात खालील दिलेल्या संकेतस्थळावर क.महाविद्यालयांच्या स्वतंत्र login वर उपलब्ध करुन देण्यात येतील.

**माहिती तंत्रज्ञान (आय.टी.) - http://examinfo.mh-hsc.ac.in/**

**सामान्यज्ञान (जी.के.) - https://gk.mh-hsc.ac.in/**

विभागीय मंडळ कार्यालयाकडून खालील विभागीय समन्वयक व जिल्हा समन्वयकांची नेमणुक केली असून त्यांचे नाव, कॉलेजचे नाव, मोबाईल नंबर यांची माहिती देण्यात आली असून,ऑनलाईन परीक्षेबाबत काही तांत्रीक अडचणी आल्यास त्यांच्याशी संपर्क करावा.

**विभागीय समन्वयक**

१) श्रीमती.सुषमा शिवगोंडा पाटील - डी.आर.के.कॉलेज ऑफ कॉमर्स,कोल्हापूर (J २३.०९.००४)
मो.नं.-९८२३६६७८५५

**सातारा जिल्हयासाठी समन्वयक**

२) श्री. विशाल रामचंद्र शिंदे - मुधोजी हायस्कुल ॲण्ड ज्यु कॉलेज,फलटन (J २१.०८.००४)
मो.नं.-९९७५०७८६५०

३) श्री किरण वसंत शिंदे - किसनवीर महाविद्यालय,वाई,ता.वाई,जि.सातारा. (J२१.११.००१)
मो.नं. -९४२२६०४३२५

४) श्री सतीश संपतराव चव्हाण - केसीटी कृष्णा स्कूल ॲण्ड ज्यु कॉलेज कराड ,ता.कराड,जि.सातारा.
(J२१.०२.०१७) मो.नं. -९७६६६०१६७७

**सांगली जिल्हयासाठी समन्वयक**

५) श्री.धनाजी शामराव शेवडे - न्यु इंग्लिश स्कुल ॲण्ड ज्यु. कॉलेज,शिराळा,जि.सांगली (J २२.०९.००९)
मो.नं.- ९८५०४३०९१७

६) श्री. शांतीनाथ चौगोंडा पाटील - माईर्स,विश्वशांती गुरूकूल स्कूल,मौजे डिग्रज रोड,सांगली (J २२.०६.०२४)
मो.नं. -८६६८८०३७४२ /९७६६६५८७६९

**कोल्हापूर जिल्हयासाठी समन्वयक**

७) श्री. वायकसकर बी.एम. - आजरा महाविद्यालय,आजरा(J२३.०१.००१)
मो.नं. ९२२५८०३७३६ / ९०४९६३५६३७

८) श्रीमती गडगे ज्योती शंकर - न्यु मॉडेल इंग्लिश स्कूल ॲण्ड ज्यु. कॉलेज ,कोल्हापूर (J२३.०९.०२७)
मो.नं. - ९०२८७४८१५६

९) श्री. कांबळे निलेश दिलीप- श्री. आण्णासाहेब डांगे आर्टस, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज,
हातकणंगले.(J.२३.०६.०२२) मो.नं.९५२७८९९६८६

समन्वयकांनी ज्या विद्यार्थ्यांची परीक्षा निर्धारित कालावधीत पूर्ण झाली नाही अशा कनिष्ठ महाविद्यालयाची माहिती मुख्य समन्वयक श्रीमती सुषमा पाटील यांना **ई -मेल** व्दारे कळवून विद्यार्थ्यांची परीक्षा घेणेबाबत त्यांच्याशी संपर्क करावा.

(एस.आर.चौगुले)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर.

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
## कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर
**५३९, राजेंद्रनगर, कोल्हापूर-४१६ ००४.**

दुरध्वनी क्र-०२३१-२६९६१०१/२/३ Website-www.sscboardkolhapur.in Email Id- divsec.kop@gmail.com


क्र.कोविमं/उमा/प्रात्य/ऑनलाइन/ 2716
कोल्हापूर ४१६००४
दिनांक- 04 /०१/२०२४

प्रति,

प्राचार्य,
माहिती तंत्रज्ञान विषय शिकवणारी सर्व कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा / सांगली / कोल्हापूर.

**विषय- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी/मार्च २०२४ "माहिती तंत्रज्ञान" (I.T) विषयाची ऑनलाईन परीक्षेबाबत...**

**संदर्भ - १) राज्य मंडळाचे पत्र क्र.रा.मं/ऑनलाईन/आय.टी./जी.के./५२६७ दि. ०५ डिसेंबर २०२३.**
**२) कार्यालयीन टिप्पणीचा मंजूरी दि. 04/०१/२०२४.**

**उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी/मार्च २०२४ च्या "माहिती तंत्रज्ञान" (I.T) व विषयाची परीक्षा खालील वेळापत्रकाप्रमाणे होईल.**

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय पत्रास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की "माहिती तंत्रज्ञान"(आय.टी.) या विषयाची परीक्षा दिनांक २० मार्च २०२४ ते २२ मार्च २०२४ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी ०१.३० आणि दुपारी ०३.०० ते ०५:३० याप्रमाणे सकाळच्या व दुपारच्या सत्रात प्रत्येकी २ तास ३० मिनिटे या कालावधीची राहील.

**या संदर्भात खालील सूचना देण्यात येत आहे.**

१) ऑनलाईन परीक्षा ही ज्या ठिकाणी "माहिती तंत्रज्ञान" (I.T) विषय शिकविण्यास मान्यता दिलेली आहे अशा सर्व कनिष्ठ महविद्यालयातच घेण्यात येईल. (माहिती तंत्रज्ञान विषय घेतलेल्या नियमित परीक्षार्थ्यांसाठी फक्त माहिती तंत्रज्ञान विषयासाठी त्यांचे कनिष्ठ महाविद्यालय हेच परीक्षा केंद्र राहील.)

या विषयासाठी विद्यार्थी त्यांच्या लेखी परीक्षा केंद्रावर (प्रसंगानुरूप) न जाता त्यांच्या कनिष्ठ महाविद्यालयात जातील या बाबतच्या सूचना संबंधितांना देण्यात याव्यात.

२) सदर परीक्षेसाठी अखंडीत विद्युत पुरवठा, दूरध्वनी सेवा व इंटरनेट कनेक्टीव्हिटी आवश्यक आहे. या दृष्टीने आपण आपल्या कार्यक्षेत्रात विभागीय / जिल्हा स्तरावरील संबंधित यंत्रणांशी संपर्क साधून त्यांच्या अखंडीत उपलब्धतेबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी. मंडळ स्तरावरून संबंधितांना तशी विनंती करण्यात आली आहे.

३) संगणक प्रयोगशाळा व संगणक यंत्रणा परीक्षेसाठी सुसज्ज करण्यात यावी. अखंडीत विद्युत पुरवठयासाठी जनरेटर, यू.पी.एस. किंवा तत्सम सामुग्रीची सोय करावी.

४) आय.टी.विषयाच्या परीक्षाचा कालावधी २.३० तासांचा आहे. यापूर्वी घेतलेल्या या विषयांच्या सर्व सराव परीक्षांचा अनुभव, प्रश्नपत्रिका आराखडयाचे स्वरूप पाहता सर्वसाधारणपणे १.४५ तास ते २ तास कालावधी प्रश्नपत्रिका सोडविण्यासाठी पुरेसा असल्याचे आढळून आले आहे. मात्र परीक्षेचे तांत्रिक स्वरूप पाहता संभाव्य तांत्रिक व्यत्ययाचा विचार करून परीक्षेचा कालावधी २.३० तास ठेवण्यात आलेला आहे. यामुळे विद्युत पुरवठा अर्ध्या तासापर्यंतच्या कालावधीसाठी खंडीत झाला असल्यास परीक्षेचे पुर्ननियोजन करण्याची आवश्यकता राहणार नाही. यापेक्षा जास्त कालावधीसाठी विद्युत पुरवठा खंडीत झाला असल्यास परीक्षेचे पुर्ननियोजन करण्यात येईल. याविषयीच्या सूचना सत्र परीक्षा झाल्यानंतर देण्यात येतील. पुनर्परीक्षेच्या वेळी विद्यार्थ्याला पूर्वीच्या परीक्षेच्या वेळी सोडविलेली उत्तरे वाचण्याची व वाटल्यास त्यात सुधारणा/बदल करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

५) परीक्षा कालावधीत परीक्षा सुरू झाल्यानंतर इंटरनेट कनेक्टिव्हिटीमध्ये व्यत्यय आल्यास विद्यार्थ्यांनी गोंधळून न जाता प्रश्नपत्रिका सोडविण्याचे काम चालू ठेवावे. कनेक्टिव्हिटी उपलब्ध झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी दरम्यानच्या काळात सोडविलेली प्रश्नांची उत्तरे सबमिट करावीत. पेपरची वेळ संपावयाच्या वेळेत कनेक्टिव्हिटी खंडित झाली असेल तर पेपरची वेळ संपताच विद्यार्थ्यांनी दिलेली उत्तरे आपोआप सबमिट होतील. सबब अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांनी गोंधळून जाण्याचे कारण नाही असे संबंधितांना सूचित करावे.

६) दिव्यांग विद्यार्थ्यांना लेखी परीक्षेप्रमाणे जादा वेळेची सवलत मान्य राहील व या विद्यार्थ्यांसाठी परीक्षेची वेळ माहिती तंत्रज्ञान या विषयासाठी ३ तास २० मिनिटे व सामान्यज्ञान या विषयासाठी २ तास ४० मिनिटे असतील. सदर माहिती विभागीय मंडळास कळविण्यात यावी.

७) गणकयंत्र विभागाकडून दिव्यांग विद्यार्थ्यांची माहिती प्राप्त झालेली आहे. या व्यतिरिक्त ऐनवेळेस असे विद्यार्थी परीक्षेसाठी आल्यास त्यांचे बैठक क्रमांक आणि कनिष्ठ महाविद्यालयांचे क्रमांक त्वरित विभागीय तांत्रिक समन्वयकांना कळवावेत. जेणेकरुन त्यांच्या परीक्षेचे नियोजन करता येणे शक्य होईल अशा प्रकरणी त्यांच्याकडून आवश्यक ते प्रमाणपत्र प्राप्त करुन विभागीय मंडळास सादर करावे अशा सूचना संबंधितांना दयाव्यात.

या विषयासाठी नोंदविलेल्या विद्यार्थ्यांचे बैठक क्रमांक गणकयंत्र विभागामार्फत संगणक प्रयोगशाळेत उपलब्ध झालेले आहेत. याव्यतिरीक्त एखाद्या विद्यार्थ्याने नव्यानेच हा विषय घेतलाअसल्यास अथवा यापूर्वी हा विषय घेतला होता, परंतू ऐनवेळी तो वगळला असल्यास त्याची माहिती तसेच हा विषय घेतलेल्या एखाद्या विद्यार्थ्यास अपात्र ठरविले असल्यास (No Candidate) त्याची सविस्तर माहिती तात्काळ ईमेलव्दारे राज्य मंडळास **दि.०२/०३/२०२४** पर्यंत कळवावी

**तांत्रिक व्यत्ययामुळे किंवा अन्य कारणामुळे परीक्षा देवू न शकणाऱ्या विद्यार्थ्यांबाबत करावयाची कार्यवाही तसेच परीक्षेसाठी नियुक्त केलेल्या विभागीय मुख्य व सहाय्यक समन्वयक यांची माहिती.**

या परीक्षा कालावधीत जे विद्यार्थी तांत्रिक व्यत्यय वा अन्य कारणामुळे निर्धारीत वेळापत्रकानुसार परीक्षा देऊ शकणार नाहीत. त्यांच्यासाठी खासबाब म्हणून सर्व परीक्षा केंद्रावर **दिनांक २३ मार्च २०२४ रोजी सकाळी ११:०० ते ०१:३० व दुपारी ३:०० ते ०५:३० माहिती तंत्रज्ञान (आय.टी.) व दि. २६ मार्च २०२४ रोजी सकाळी ११:०० ते ०१:०० व दुपारी ०३:००ते ०५:०० सामान्यज्ञान (जी.के.) या विषयांसाठी पुनर्परीक्षेची संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.**

ज्या विद्यार्थ्यांची उपरोक्त कारणास्तव परीक्षा होणार नाही अशा कनिष्ठ महाविद्यालयांनी माहिती तंत्रज्ञान (आय.टी.) विद्यार्थ्यांची माहिती दिनांक २२ मार्च २०२४ व सामान्यज्ञान (जी.के.) दिनांक २३ मार्च २०२४रोजी या विषयांच्या ऑनलाईन परीक्षांच्या दुसऱ्या सत्रा पर्यंत विभागीय मंडळ कार्यालयातील विभागीय तांत्रिक सहाय्यक समन्वयकांना कळविणे आवश्यक आहे. सदर पुनर्परीक्षेसाठी कोणतेही अतिरिक्त शुल्क आकारण्यात येऊ नये.

८) सर्वसाधारण परीक्षेमध्ये विद्यार्थ्यांना ज्या कारणासाठी गैरमार्गाचा अवलंब करण्याबद्दल शिक्षा बजावली जाते ती कारणे व शिक्षेची तरतूद 'ऑनलाईन' परीक्षेसाठी लागू राहील. लेखी परीक्षेप्रमाणेच विद्यार्थ्यांना कोणतेही अतिरिक्त साहित्य, तसेच मोबाईल, पेजर, कॅलक्युलेटर इत्यादी तत्सम इलेक्ट्रॉनिक साहित्य/वस्तू परीक्षेच्यावेळी जवळ बाळगता येणार नाही अशा स्पष्ट सूचना द्याव्यात.

९) जो विद्यार्थी नियोजित सत्रामध्ये परीक्षेस उपस्थित राहू शकणार नाही व पुढील सत्रासाठी उपस्थित रहाण्याबाबत इच्छा व्यक्त करेल त्या विद्यार्थ्यांचा बैठक क्रमांक, मूळ बॅच क्रमांक व तो कोणत्या सत्रामध्ये प्रविष्ठ होऊ इच्छित आहे याची माहिती ज्या परीक्षा सत्रात तो हजर रहाणार आहे ते परीक्षा सत्र सुरु होण्यापूर्वी किमान एक तास विभागीय तांत्रिक समन्वयक यांना संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाने कळविणे आवश्यक आहे. अन्यथा त्या विद्यार्थ्यांची परीक्षा त्या सत्रात होऊ शकणार नाही.

१०) तांत्रिक सहाय्यकाने परीक्षा कालावधीत केंद्रावर उपलब्ध असणे आवश्यक असले तरी त्यांने विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारे मदत करावयाची नसून प्रयोग शाळेत पर्यवेक्षकांनी बोलाविल्याशिवाय जावयाचे नसल्याबाबत त्यांना स्पष्ट सूचना देण्यात याव्यात.

११) मार्च २०२४ परीक्षेपासून गोपनीय साहित्य,तसेच गोपनीय सूचना ऑनलाईन स्वरुपात खालील दिलेल्या संकेतस्थळावर क.महाविद्यालयांच्या स्वतंत्र login वर उपलब्ध करुन देण्यात येतील.

**माहिती तंत्रज्ञान (आय.टी.) - http://examinfo.mh-hsc.ac.in/**

**सामान्यज्ञान (जी.के.) - http://gk.mh-hsc.ac.in/**

१२) परीक्षा काळात येणाऱ्या समस्यांसाठी खालील राज्य समन्वयकांशी दूरध्वनी/मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा.

**१.सुषमा पाटील - ९८२३६६७८५५** **२.समाधान ढाणे-७५८८०५९६५४**

सदर माहिती तंत्रज्ञान विषयाच्या 'ऑनलाईन' परीक्षा संचलनाबाबत परीक्षा केंद्रसंचालक, पर्यवेक्षक व तांत्रिक सहाय्यक यांच्या नेमणूका व त्यांची पार पाडावयाची कामे याबाबतच्या मार्गदर्शक सूचना सोबत पाठवित आहे.संबंधित व्यक्तिंना द्यावयाच्या मानधनाचे दर खालीलप्रमाणे असून त्याप्रमाणे त्यांना मानधन देण्याची व्यवस्था करावी.

| | |
|---|---|
| १)केंद्रसंचालक | एकवट मोबदला रु१६५ +प्रति सत्र रु५०/- प्रमाणे |
| २)पर्यवेक्षक | प्रति सत्र रुपये ३०/- प्रमाणे |
| ३) तांत्रिक सहाय्यक | प्रति सत्र रुपये ३०/- प्रमाणे |
| ४)शिपाई | ३०० विद्यार्थ्यांपर्यंत एक शिपाई एकवट मानधन रु.१०० |

(एस.आर.चौगुले)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर.

## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे

### उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता १२ वी ) परीक्षा

### फेब्रुवारी / मार्च २०२४ माहिती तंत्रज्ञान या विषयाची ऑनलाईन परीक्षा

माहिती तंत्रज्ञान या विषयाच्या ऑनलाईन परीक्षा संचालनाबाबत परीक्षा केंद्र संचालक, पर्यवेक्षक व तांत्रिक सहाय्यक यांच्या नेमणूका, त्यांनी परीक्षा कालावधीत पार पाडावयाची कामे व त्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना-

### (भाग -१)

१) **केंद्र (परीक्षा स्थळ)-** माहिती तंत्रज्ञान विषय शिकविल्या जाणाऱ्या प्रत्येक कनिष्ठ महाविद्यालयाची संगणक प्रयोगशाळा हे परीक्षा स्थळ राहील. त्यास केंद्र म्हणून संबोधण्यात येईल.

२) **केंद्र संचालक-** परीक्षा स्थळाच्या कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य किंवा प्राचार्यांनी नामनिर्देश केलेली सक्षम व्यक्ती केंद्र संचालक म्हणून काम पाहील.

३) **पर्यवेक्षक-** केंद्र संचालक पर्यवेक्षकांच्या नियुक्त्या करतील. नियुक्त केलेल्या पर्यवेक्षकांना प्रशिक्षण विभागीय मंडळाद्वारे ऑनलाईन सभेत दिले जाईल.

**पर्यवेक्षक नियुक्ती / मार्गदर्शक सूत्रे.**

अ) शाळा कनिष्ठ महाविद्यालयामध्ये शिकवित असलेल्या व्यक्तींमधूनच पर्यवेक्षक नियुक्ती करण्यात यावी.

ब) पर्यवेक्षक हा **'संगणक साक्षर'** असून संगणकावर काम करता येणार असल्याची खात्री करून घ्यावी.

क) पर्यवेक्षक कनिष्ठ महाविद्यालयीन स्तरावर, माध्यमिक शाळेत अथवा महाविद्यालयात माहिती तंत्रज्ञान विषय शिकविणारा नसावा.

ड) सदर परीक्षा ३ दिवस व ६ सत्रांमध्ये घेतली जाईल. २० ते २५ विद्यार्थ्यांच्या गटाकरिता एक याप्रमाणे योग्य संख्येने पर्यवेक्षकांची नियुक्ती करावी.

**४) तांत्रिक सहाय्यकांच्या सूचना-**

०१. परीक्षेपूर्वी Dry Run घेण्यात यावी.

०२. परीक्षा कालावधीत तांत्रिक अडचण असेल तरच लॅब मध्ये प्रवेश करावा व वेळोवेळी www.examinfo.mh-hsc.ac.in या संकेत स्थळावर माहिती पाठवावी.

०३. परीक्षा चालू असताना परीक्षाबाबतची स्थिती जिल्हा समन्वयक व विभागीय समन्वयक यांना whatsup द्वारे वेळोवेळी सांगावी.

०४. प्रत्येक बॅचची परीक्षा संपल्यानंतर बॅचवाईज विद्यार्थ्यांची answer file ची साईज तपासावी व ती file server वर कॉपी करावी.

०५. सर्व विद्यार्थ्यांची परीक्षा पूर्ण झाल्यानंतर चौथ्या दिवशी सर्व Answer file राज्य मंडळामार्फत दिल्या गेलेल्या link वर upload कराव्यात व Answer file upload झालेले प्रमाणपत्र व गैरहजरी रिपोर्ट, केंद्राची बिले व्यवस्थित भरुन विभागीय मंडळाने दिलेल्या केंद्रावर वेळेत जमा करावीत.

**परीक्षेच्या प्रत्येक दिवशी प्रत्येक सत्रापूर्वी करावयाची कामे**

१) तांत्रिक सहाय्यकांनी सत्र वेळेपूर्वी एक तास आधी प्रयोगशाळा सुरु करावी. Internet ची जोडणी करावी, सर्व संगणक सुरळीत चालू आहेत व त्यावरुन Internet शी संपर्क साधता येत आहे याची खात्री करुन घ्यावी. तसेच यूपीएस किंवा जनरेटरची परीक्षेपूर्वी तपासणी करण्यात यावी.

२) पर्यवेक्षकांनी निर्धारित वेळेपूर्वी किमान ३० मिनिटे प्रयोगशाळेत हजर रहावे. तसेच केंद्रसंचालकांकडून त्या सत्रासाठी असलेले गोपनीय Login ID व Password प्राप्त करुन घ्यावेत.

३) परीक्षार्थींना परीक्षेपूर्वी २० मिनिटे प्रयोगशाळेत हजर राहण्यास सांगावे व प्रवेश द्यावा.

## केंद्रसंचालकांची कर्तव्ये

१) पर्यवेक्षक व तांत्रिक सहाय्यकांच्या नियुक्त्या करणे.

२) केंद्राचा अहवाल विभागीय मंडळांना पाठविणे.

३) परीक्षा सुरळीत सुरू असल्याची खात्री करून घेवून विभागीय मंडळांना त्याप्रमाणे अहवाल पाठविणे.

४) परीक्षा संपल्यानंतर परीक्षार्थ्यांची स्वाक्षरी तक्ते केंद्राकडून प्राप्त करून घेणे व ते विभागीय मंडळाकडे सुपूर्द करणे.

५) बॅचवाईज टाइमटेबल विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देणे.

६) वीज पुरवठा, दूरध्वनी व इंटरनेट यांच्या सुविधा सुरळीत व अखंडीतपणे सुरू आहेत व राहतील याची खात्री करून घेणे.

७) परीक्षा केंद्रावर कोणताही गैरप्रकार होणार नाही याची दक्षता घेणे.

## पर्यवेक्षकांची कर्तव्ये

१) परीक्षेच्या प्रत्येक सत्रापूर्वी किमान ३० मिनिटे आधी परीक्षा केंद्रावर हजर राहणे.

२) विद्यार्थ्यांना बॅचवाइज टाइम टेबल प्रमाणे प्रयोगशाळेत प्रवेश देणे.

३) विद्यार्थ्यांनी Login फॉर्ममधील माहिती बिनचूक भरली आहे याची खात्री करणे व Login फॉर्मवर Password भरणे. सदर काम परीक्षा सुरू होण्यापूर्वी करावयाचे असून यासाठी गरज भासल्यास तांत्रिक सहाय्यकांची मदत घ्यावी.

४) परीक्षा सुरू झाल्यानंतर परीक्षा पूर्ण होईपर्यंत काळजी घेणे.

५. ऑनलाईन स्वरुपात वेबसाईट वरती दिलेला हजर/गैरहजर रिपोर्ट Download करुन प्रिंट काढावा व त्यावर पेपर कोड नंबर तपासून विद्यार्थ्यांची स्वाक्षरी घ्यावी.

**टीप -१) परीक्षेसंदर्भात काही मोठया समस्या (Major problems) आल्यास मा.विभागीय सचिव, कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर यांच्याशी तात्काळ संपर्क साधावा. कोणीही कोणत्याही प्रकारच्या अडचणींसाठी राज्यमंडळाकडे परस्पर संपर्क साधू नये याची नोंद घ्यावी.**

२) पर्यवेक्षक व तांत्रिक सहाय्यक यांना प्रशिक्षण दिले जाणार आहे. त्यावेळी त्यांना त्यांच्या कर्तव्याविषयी सविस्तर माहिती दिली जाईल.)